# Impact of Online Stories on Students:
## Feedback by Ms Swati Pratap Poi(Mother of Vijay Pratap Poi)

आजच्या या कोरोना महामारीच्या काळात प्रत्येक पालक आपल्या मुलांसाठी खुप चिंतेत आहे . त्यापैकीच मी एक .शाळा बंद ,बाहेर जाणे बंद. मग मुलांना सांभाळायचं कसं? त्यांच्यात उत्पन्न होणारी ऊर्जा, उत्साह यांचा चांगल्या कामी उपयोग कसा करुन घेता येईल हा माझ्या समोर खुप मोठा प्रश्न होता. पण फुड फॉंर थॉंट फाउंडेशन द्वारे घेतले जानारे उपक्रम व गोष्टी यांनी माझ्या मुलाला(विराज प्रताप पोळ) योग्य संस्कार,कला व वेळेचा चांगला उपयोग करुन घेण्यास मोलाची मदत केली.गोष्टींतुन आपण काय बोध घ्यायचा याची जाणीव त्याला हळुहळु होऊ लागली.

गोष्ट सांगणे चालु असतानाच, त्यावर आधारीत आपल्याला  कोणते व कसे चित्र रेखाटता येईल याच्या कल्पना त्याच्या डोक्यात चालु होत. चित्र काढायला तर सर्वच मुलांना आवडतात , पण त्यातही स्व:कल्पनेतुन रेखाटलेली बोलकी चित्रे  आणखीणच सुंदरता प्राप्त करतात.ते सर्व शक्य झाले फुड फॉंर थॉंट फाऊंडेशन टीम मुळे.




माधुरी मॅंम,अंजली मॅंम, बिंदीया मॅंम, दिप्ती मॅंम,विना मॅंम यांनी खुप चांगल्या प्रकारे विविध साधनांचा वापर करुन मुलांना गोष्टी सांगीतल्या.श्रीषा मॅंम आणि माधवी मॅंम यांनी योग्य नियोजन व तांत्रीक माहीतीद्वारे सर्व मुलांना एकत्र जोडले.मॅंडम ज्या प्रकारे प्रॉंप्स बनवतील त्या प्रकारे त्याने त्या बनवण्याचा प्रयत्न केला आणि खुप काही शिकत गेला. विविध नेते ,स्वतंत्र्यसेनानी,देशभक्त ,यांचे चरित्रात्मक गोष्टींतुन खुप काही त्याला शिकायला मिळाले. आता तो योग्य प्रकारे ,योग्य साधनांचा वापर करुन उत्कृष्ट गोष्ट सांगु शकतो. Thank you Food4thoughtfoundation

**Written by: Ms Swati Pratap Poi (Mother of Vijay Pratap Poi a student of Sri Sri Gnan Mandir ,Shingnapur)**